अपर पोलीस महासंचालक व संचालक
पोलीस दळणवळण माहिती तंत्रज्ञान व परिवहन
महाराष्ट्र राज्य, पुणे
दुरध्वनी/फॅक्स क्रमांक ०२०२५८८०७१८
ई मेल- igmteb२३@gmail.com

---

जा.क्र.आशा-५/सेनि-पोउपअधी/नियुक्ती/ २९० /२०२६ पुणे दिनांक - ०२/०१/२०२६ ०२

प्रति,

मा.पोलीस महासंचालक,
महाराष्ट्र राज्य, मुंबई
(लक्षवेध :- अपर पोलीस महासंचालक, नि.व स., आणि
कार्यासन अधिकारी, क्र.०२ अ, ०३ अ आणि ३३)

संदर्भ :- ०१) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.सीबीई ५२५/प्र.क्र.३७/आस्थामं (का.१३), दि.१०/०६/२०२५

०२) गृह विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-०८२१/प्र.क्र.७०/पोल-३, दि.२३/०९/२०२१

विषय :- विशेष पोलीस महानिरीक्षक मोटार परिवहन विभागातील विवक्षित कामासाठी सेवानिवृत्त पोलीस उप अधीक्षक दर्जाचे पोलीस अधिका-यांना सेवाकरार पध्दतीने नियुक्ती करणेबाबत.

-----ooo-----

उपरोक्त संदर्भ व विषयान्वये सविनय सादर करण्यात येते की, संदर्भीय **शासन निर्णय क्र.०१** अन्वये विवक्षित कामासाठी सेवानिवृत्त पोलीस उप अधीक्षक यांना सेवाकरार पध्दतीने सेवा घेण्याबाबत निर्देश आहेत. तसेच सदर सेवाकरार पध्दतीने नियुक्ती देताना एकुण मंजुर पदसंख्येच्या जास्तीत जास्त १०% इतक्या अधिका-यांना सेवाकरार पध्दतीने नियुक्ती देता येईल, अशी तरतुद आहे. पोलीस दळणवळण व माहिती तंत्रज्ञान विभागामध्ये सद्य:स्थितीत खालील प्रमाणे पदे मंजुर, हजर व रिक्त आहेत.

| अ.क्र. | पदनाम | मंजुर | हजर | रिक्त |
|---|---|---|---|---|
| ०१ | पोलीस उप अधीक्षक | ११ | ०५ | ०६ |

**संदर्भ क्र.०२** मध्ये नमुद शासन निर्णयान्वये, विशेष पोलीस महानिरीक्षक मोटार परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना **"विभाग प्रमुख"** म्हणुन घोषित करण्यात आलेले आहे. विशेष पोलीस

Deepak
30.01.26

महानिरीक्षक मोटार परिवहन विभागामध्ये वरील प्रमाणे पदे ब-याच प्रमाणात रिक्त आहेत. या विभागातील विवक्षित कामांसाठी सेवानिवृत्त पोलीस उप अधीक्षक (विशेष पोलीस उप अधीक्षक, मो. प. अधिकारी ) अशी एकुण ०१ पदे या कार्यालयाचे आस्थापनेवर, सेवाकरार पध्दतीने नियुक्ती देण्याची कार्यवाही घेण्यात येत आहे.

वरील प्रमाणे पदांचे सेवाकरार पध्दतीने नियुक्त करण्यात येणारे ०१ सेवानिवृत्त पोलीस उप अधीक्षक यांचे त्यांचे निवृत्तीवेतनाचा आढावा घेवून, त्यांचे देय होणारे मासिक पारिश्रमिक व भत्ते, त्यासाठी आवश्यक वार्षिक खर्चाचा तपशिल व अनुदान मागणी आपले कार्यालयास स्वतंत्र प्रस्तावपत्राद्वारे सादर करीत आहोत.

तसेच वरील प्रमाणे एकुण ०१ सेवानिवृत्त पोलीस उप अधीक्षक सेवाकराराने नियुक्ती देण्याबाबतची जाहिरात व विहित नमुना अर्ज व इतर माहिती कृपया आपले संकेतस्थळ www.mahapolice.gov.in वर प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

कृपया अवलोकनार्थ व आदेशार्थ सादर.

( दीपक शिवानंद पाण्डेय् ) ३०.०१.२५

अपर पोलीस महासंचालक व संचालक,

पोलीस दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे

# विशेष मोटार परिवहन अधिकारी यांची सेवाकरार पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती:-

जा.क्र.प्रलि,आस्था-०१/सेवा करार/से.नि.पो.अधि./विवक्षित कामे/२०२६,

दि.  /०१/२०२६.

## विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे औंध, पुणे-४११००७

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.सीबीई १५२५/प्र.क्र.३७/आस्थामं(का.१३), दि.१०/०६/२०२५ मधील तरतुदींनुसार, विवक्षित कामांसाठी विशेष पोलीस महानिरीक्षक मोटार परिवहन विभागामधुन स्वेच्छा / नियत वयोमानाने सेवानिवृत्त झालेले खालील नमुद अधिकारी यांची सेवा करार पध्दतीने नियुक्ती करण्यात येणार आहे.

| पदनाम | पदसंख्या | नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|
| विशेष पोलीस उप अधीक्षक, मोटार परिवहन अधिकारी, (सेवानिवृत्त पोलीस उप अधीक्षक) | ०१ | विशेष पोलीस महानिरीक्षक मोटार परिवहन विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अधिपत्याखालील विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन, पुणे कार्यालय, पोलीस अधीक्षक, मो.प.नागपूर, पोलीस अधीक्षक, मो.प.छत्रपती संभाजीनगर/ कोकण परिक्षेत्र,/ पुणे परिक्षेत्र / पोलीस उप अधीक्षक मो.प.कार्यालयाचे अधिनस्त कार्यालयामध्ये |

वरील पदासाठी करावयाच्या अर्जाचा नमुना, प्रतिज्ञापत्र, अटी व शर्ती, अनुभव, वयोमर्यादा/मासिक परिश्रमिक व भत्ते/कर्तव्य व जबाबदा-या ही माहिती, मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. तरी अर्हता प्राप्त इच्छुकांनी त्यांचे अर्ज आणि प्रतिज्ञापत्र दोन लिफाफ्यामध्ये, सदर जाहिरात प्रसिध्द झालेपासुन **दि.०३/०३/२०२६** रोजी कार्यालयीन वेळेपर्यंत विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन, म.रा.पुणे या कार्यालयामध्ये प्रमुख लिपीक, आस्थापना शाखा-०१ यांना लक्षवेध करुन प्रत्यक्ष सादर करावेत. त्यानंतर प्राप्त होणारे अर्जांचा विचार केला जाणार नाही.

**सुचना व अटी :-**

उपरोक्त निवड प्रक्रिया सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रसिबीई१५२५/प्र.क्र.३७/आस्थामं(का.१३) दि.१०-०६-२०२५ मधील तरतुदीनुसार राबविण्यात येईल.

30.01.26

**( दीपक शिवानंद पाण्डेय )**

अपर पोलीस महासंचालक व संचालक,

पोलीस दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे

**विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे कार्यालयामध्ये विवक्षित कामांकरिता सेवा करार पध्दतीने नियुक्ती प्रकरणी विहित नमुन्यात अर्ज मागविणत येत आहे.**

---

**खालील माहिती सोबत जोडली आहे .**

०१) अर्जाचा नमुना

०२) अर्जदाराने दयावयाचे प्रतिज्ञापत्र

०३) अ) अनुभव व वयोमर्यादा

ब) मासिक परिश्रमिक व भत्ते

क) कर्तव्य व जबाबदाऱ्या

ड) अटी व शर्ती

इ) विशेष पोलीस महानिरीक्षक मोटार परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे या विभागातील सेवानिवृत्तीचे आदेश, सेवानिवृत्तीचे ओळखपत्र (मुळ प्रतीसह सत्यप्रती)

ई) निवृत्ती वेतन पी.पी.ओ. पुस्तक, ०२ पासपोर्ट साईज फोटो (मुळ प्रतीसह सत्यप्रती)

# अर्जाचा नमुना (०१)

| कार्यालयीन उपयोगासाठी :- | २.५ सें.मि.X २.५ सें.मि. आकाराच्या एका फोटोवर स्वाक्षरी करुन या जागी चिटकवावा व दुसरा फोटो स्वाक्षरी करुन अर्जासोबत लिफाफयामध्ये जोडावा. फोटोचे पाठीमागे संपुर्ण नाव व मोबाईल क्रमांक नमुद करावा. |
|---|---|
| ०१) अर्ज क्रमांक :- | |
| ०२) अर्ज स्विकारल्याचा दिनांक | |
| ०३) अर्ज स्विकारणा-याची स्वाक्षरी (दिनांकासह) ---------------------------- | |

सुचना :- अर्जातील अंक फक्त इंग्रजी भाषेमध्ये लिहावेत.

## अर्जदाराची वैयक्तिक माहिती :-

०१. अर्जदाराचे संपुर्ण नाव : आडनाव नाव वडीलांचे/पतीचे नाव

मराठीत :- ----------------------------------------------------------------------------------------------------

इंग्रजीत :-

०२. पत्रव्यवहाराचा पत्ता :- ----------------------------------------------------------------------------------------

तालुका :- --------------------------, जिल्हा :- -------------------------- पिन कोड :- --------------------------

०३. कायमचा पत्ता :- ----------------------------------------------------------------------------------------

तालुका :- --------------------------, जिल्हा :- -------------------------- पिन कोड :- --------------------------

०४. दुरध्वनी क्रमांक :- ---------------------------------- व मोबाईल क्रमांक :- ----------------------------------

०५. ई-मेल आयडी :- ------------------------------------------------------------------

०६. जन्मदिनांक :- --------------------------------------------

०७. शासकीय सेवेतील नियुक्तीचा दिनांक :- --------------------------------------

०८. पोलीस उपअधीक्षक पदावरुन सेवानिवृत्तीचा दिनांक :- --------------------------------------

०९. लिंग :- पुरुष / महिला (बरोबर अशी खुण करावी)

१०. अर्जदार म्हणजे करार पध्दतीने नियुक्त करावयाचे सेवानिवृत्त अधिकारी यांच्या विरुध्द कोणतीही प्राथमिक /विभागीय चौकशी/न्यायालयीन प्रकरणाची कार्यवाही चालू किंवा प्रस्तावित आहे काय :-
होय / नाही (बरोबर अशी खुण करावी)

उमेदवाराचे नाव व स्वाक्षरी

# प्रतिज्ञापत्र (०२)

मी, श्री. / सौ. / कु.--------------------------------------------------------------------------------याद्वारे प्रतिज्ञापूर्वक असे जाहीर करतो / करते की, वरील माहिती जाणीवपुर्वक तसेच विश्वासपुर्वक दिली असून, ती खरी आहे. जाहिरातीमध्ये दिलेल्या सर्व निकषांनुसार व अटी / शर्तींनुसार मी पात्र आहे. अर्जात नमुद केलेली कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी सेवा करार पध्दतीने होणारी निवड / नियुक्ती रदद केल्यास, त्याबाबत माझी काहीही तक्रार राहणार नाही. अर्जात नमुद केलेली माहिती खोटी अथवा चुकीची असल्यास त्याची पुर्णपणे जबाबदारी माझ्यावर राहील व कायदेशीर कारवाईस मी पात्र राहीन. तसेच, मी भरती प्रक्रियेमध्ये कोणत्याही प्रकारची वशिलेबाजी किंवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास, मी अपात्र ठरेन.

ठिकाण :-

दिनांक :-

अर्जदाराची स्वाक्षरी

**उपरोक्त निवड प्रक्रिया राबविताना सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.सीबीई १५२५/ प्र.क्र.३७/आस्थामं (का.१३), दि.१०/०६/२०२५ मधील अटी व शर्तींचे पालन करणे आवश्यक आहे. सदर शासन निर्णयात खालील प्रमाणे नमुद करण्यात आलेले आहे.**

**अ) निवड प्रक्रिया व नियुक्ती :-**

**०१. नामिकासूची (Panel) :-** सेवा करार पध्दतीने विवक्षित कामांसाठी नेमणुका करताना पारदर्शक पध्दतीचा अवलंब करण्यात यावा. विहित पध्दतीने जाहिरात देऊन विवक्षित कामांसाठी पात्र सेवानिवृत्त पोलीस अधिका-यांकडून अर्ज मागविण्यात यावेत. जाहिरातीमध्ये नामिकासूचीत नियुक्त करावयाच्या एकुण व्यक्तींची संख्या, विवक्षित कामांचे स्वरुप, कालावधी आणि देय मासिक पारिश्रमिक (शासन निर्णयातील ड (१) (क) च्या अनुषंगाने) यांचा उल्लेख करण्यात यावा आणि प्राप्त उमेदवाराची निवड करुन नामिकासूची (Panel) नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांनी तयार करावी.

**०२. नामिकासूचीची (Panel) वैधता :-** सदर नामिकासूचीतील व्यक्तींमधुनच सेवा करार पध्दतीने नियुक्ती करण्यात यावी. सदर नामिकासूचीची वैधता जास्तीत जास्त ०३ वर्षे राहील तसेच त्या सूचीचा वार्षिक आढावा घेण्यात यावा.

**०३. एमपॅनलमेंटचा कालावधी :-** विवक्षित कामाचे स्वरुप आणि व्याप्ती विचारात घेऊन ते काम पुर्ण करण्याचा कालावधी सक्षम प्राधिकारी यांनी निश्चित करावा.

**०४. बंधपत्र / हमीपत्र :-** नियुक्तीच्या कालावधीत सेवा करार पध्दतीने विवक्षित काम पुर्ण करण्याची जबाबदारी संबंधित व्यक्तीची राहील या आशयाचे बंधपत्र/हमीपत्र त्यांच्याकडून घेण्यात यावे. तसेच सदर बंधपत्रात/हमीपत्रात, सेवा करार पध्दतीने नियुक्ती देताना शासनाने या निर्णयान्वये विहित केलेल्या अटी व शर्ती, विभागाने निश्चित केलेल्या अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचा, तसेच सेवा करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींकडून नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करण्यात येणार नाही, याचा उल्लेख करण्यात यावा.

**०५. नियुक्ती आदेश :-** नामिकासूचीमधील व्यक्तीकडून बंधपत्र प्राप्त झाल्यानंतर सेवा करार पध्दतीने नियुक्ती देण्याबाबतच्या आदेशांमध्ये एमपॅनलमेंटचा विषय विवक्षित स्वरुपाचे काम आणि ते काम पुर्ण करण्यासाठी अपेक्षित असलेल्या कालावधीचा स्पष्टपणे उल्लेख करुन सक्षम प्राधिकारी यांनी नियुक्ती आदेश काढावेत.

**०६. सेवा करार पध्दतीने नियुक्ती द्यावयाच्या व्यक्तींची संख्या :-** सेवा करार पध्दतीने नियुक्ती देताना कार्यालयातील/ आस्थापनेवरील एकुण मंजुर पदसंख्येच्या जास्तीत जास्त १० % इतके अधिका-यांना सेवा करार पध्दतीने नियुक्ती देता येईल. सेवा करार पध्दतीने नियुक्त्या करण्याचे प्रस्ताव तयार करताना कामाचे स्वरुप, आकस्मिकता, सार्वजनिक हित इ. बाबी विचारात घेण्यात यावा.

**०७. सेवा करार पध्दतीने नियुक्तीची कालमर्यादा :-** सदर कामासाठी सेवा करार पध्दतीने देण्यात येणारी नियुक्ती एका वेळी जास्तीत जास्त एका वर्षासाठी देण्यात यावी. परंतु अशा नियुक्तीचे आवश्यकतेनुसार वाढीव कालावधी करिता दरवर्षी नुतनीकरण करता येईल. मात्र, एकुण कालावधी तीन वर्षापेक्षा अधिक असणार नाही.

**०८. वयोमर्यादा :-** सेवा करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्ती त्याच्या वयाच्या ६५ व्या वर्षापर्यंतच कार्यरत राहू शकतील. तथापि, ज्या व्यक्तींच्या सेवा त्यानंतर चालू ठेवणे आवश्यक आहे, असे मत असेल त्यांच्या सेवा सक्षम प्राधिका-यास एकस्तर वरीष्ठ अधिका-याच्या/प्राधिका-याच्या मान्यतेने पुढे चालू ठेवता येतील मात्र, कोणत्याही करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्ती त्याच्या वयाच्या ७० व्या वर्षापर्यंतच कार्यरत राहू शकतील.

**०९. सक्षम प्राधिकारी :-** सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.सीबीई १५२५/प्र.क्र.३७/आस्थामं(का.१३), दि.१०/०६/ २०२५ मधील तरतुदींनुसार, पोलीस दळणवळण व माहिती तंत्रज्ञान, महाराष्ट्र राज्य विभागातून गट-अ (वेतनस्तर एस-२५ पेक्षा कमी) संवर्गीय सेवेतुन सेवानिवृत्त झालेले पोलीस उपअधीक्षक यांना सेवा करार पध्दतीने नियुक्ती देण्याचे अधिकार महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ मधील नियम क्र.९ (२२) नुसार घोषित करण्यात आलेल्या विभाग प्रमुखांना (Head Of the Department) असतील.

**१०. अर्हता व अनुभव :-**

**०१.** विवक्षित कामासाठी लागणारी विशेष अर्हता अथवा संबंधित कामाचा किमान तीन वर्षाचा अनुभव ही पूर्व अट ठेवण्यात यावी.

**०२.** सेवा करार पध्दतीने नियुक्त करावयाचा सेवानिवृत्त अधिकारी हा शारिरीक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

**०३.** सेवा करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिका-याच्या विरुध्द कोणतीही विभागीय चौकशी / प्राथमिक चौकशी / न्यायप्रविष्ठ प्रकरण / गुन्हा दाखल चालू किंवा प्रस्तावित नसावे किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.

**११. मासिक पारिश्रमिक व भत्ते :-**

०१) **मासिक परिश्रमिक :-**

**ए) शासकीय सेवा :-** सेवानिवृत्त पोलीस उपअधीक्षक/पोलीस निरीक्षकांची विहित कार्यपध्दतीचे पालन करुन सेवा करार पध्दतीने नेमणुक करताना त्यांना अशा नियुक्तीच्या वेळी महागाई भत्यासह मिळत असलेल्या निवृत्ती वेतनाएवढी रक्कम (अशंराशीकृत निवृत्ती वेतन वगळून) त्यांचे मासिक परिश्रमिक म्हणुन निश्चित करण्यात यावे आणि एकदा निश्चित करण्यात आलेले परिश्रमिक त्यांच्या करार पध्दतीने नियुक्तीच्या कालावधीसाठी (जास्तीत जास्त ०३ वर्षे) कायम राहील.

**बी) भत्ते :-** उक्त तरतुदीनुसार निश्चित होणा-या मासिक परिश्रमिकांच्या जास्तीत जास्त २५% इतक्या मर्यादेपर्यंत एकमुस्त रक्कम निवास भत्ता, प्रवास भत्ता आणि दुरध्वनी भत्ता या सर्व भत्यापोटी प्रतीमाह अनुज्ञेय असेल. सदर रक्कम नियुक्त करावयाचे अधिकारी यांची कार्यक्षमता, कार्यकुशलता, त्यांना पुरविण्यात आलेल्या सोई-सुविधा इत्यादी बाबी विचारात घेवून निश्चित करण्यात यावी.

**सी) प्रवास भत्ता व दैनिक भत्ता :-** सेवा करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीस आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना त्यांच्या निवृत्तीवेळच्या वेतनमानास अनुसरुन प्रवासभत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील.

**डी)** सेवा करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे अशा व्यक्तींना अनुज्ञेय होणा-या परिश्रमिकाचा कोणताही परिणाम त्यांना प्राप्त होणा-या निवृत्ती वेतन व महागाई भत्ता यांवर होणार नाही.

**ई)** सेवा करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आलेल्या व्यक्तीच्या पारिश्रमिकापोटी व भत्त्यापोटी होणारा खर्च संबंधित कार्यालयाच्या कार्यालयीन खर्च या शिर्षा खाली उपलब्ध असलेल्या तरतुदीतून भागविण्यात यावा.

१२. कर्तव्य व जबाबदा-या :-

नेमुण दिलेली विवक्षित कामे व वरिष्ठ पोलीस अधिका-यांनी वेळोवेळी दिलेली कामे विहित वेळेत, बिनचुक व विना तक्रार करणे आवश्यक राहील. (पोलीस उपअधीक्षक या पदांची विवक्षित कामांचे स्वरुप त्यांना नियुक्ती देतानाचे आदेशामध्ये नमुद करण्यात येईल.)

१३. <u>अटी व शर्ती :-</u>

०१. सेवा करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितांस शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे/सामावून घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/हक्क नसेल.

०२. नियुक्तीसाठी सक्षम अधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिका-यांच्या सेवा करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार असतील.

०३. सेवा करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आलेली व्यक्ती, सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यवसायिक कामात गुंतलेली नसावी.

०४. सेवा करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने गुंतलेले हीत संबंध (Conflict Of Interest) जाहिर करणे आवश्यक राहील.

०५. सेवा करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणा-या कागदपत्रे/माहिती व आधार सामुग्रीबाबत गोपनियता पाळणे आवश्यक राहील.

०६. सेवा करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांचेवर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पुर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत नियुक्तीसाठी सक्षम असलेले प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेवून कामाचे मूल्यमापन करतील.

०७. सेवा करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदा करता येणार नाहीत.

०८. सेवा करार पध्दतीने नियुक्ती करताना सामान्य प्रशासन विभाग आणि वित्त विभागाच्या सहमतीची आवश्यकता असणार नाही.

०९. नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त/स्वेच्छा सेवानिवृत्त झालेल्या पोलीस अधिकारी यांना कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ, पुनर्नियुक्ती देण्यात येऊ नये.

**********